# जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

## दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत कंत्राटी तत्वावरील रिक्त पदे भरणेबाबत जाहिर सुचना

**जाहिरात क्रमांक/कलि/नपाप्र/कावि/५२६/२०१७, दि. ०६/१२/२०१७**

संदर्भः- या कार्यालयाकडुन काढण्यात आलेली जाहिरात क्रमांक/कलि/नपाप्र/कावि/५१५/२०१७, दि. २३/११/२०१७

<u>शुध्दीपत्रक</u>

शासन निर्णय नगर विकास क्र.एनयुएलएम-२०१७/प्र.क्र./१४४/नवि-२० दि.३१ ऑक्ओबर २०१७ नुसार दिलेल्या निर्देशान्वये केद्र शासन पुरस्कृत दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत जिल्हातील नगर परिषदामधील सहाय्यक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटकांची ठोक मानधनावरील कंत्राटी तत्वावरील रिक्त पदे भरणेबाबत इच्छुक व पात्र उमेदवाराकडुन सदर जाहिरातीव्दारे दिनांक ०७/१२/२०१७ पावेतो अर्ज दाखल करणेबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर जाहिरातील मुद्दा क्र. ३.१ नुसार उमेदवारांना जाहिरातीमध्ये नमुद पदाकरीता विहीत केलेला अर्जाचा नमुना http://yavatmal.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. अर्जात आवश्यक सर्व रकान्यात अचुक माहिती भरुन विहीत ठिकाणी स्वतःचा अलीकडच्या काळातील फोटो चिकटवून तो साक्षांकित करावा तसेच शैक्षणीक अर्हता व इतर सर्व प्रमाणपत्रे साक्षांकित करुन अर्जासोबत सादर करावे. (साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी किंवा सक्षम प्राधिका-यांने केलेल असावे.) असे जाहिरातीमध्ये नमुद करण्यात आले होते.

**उक्त जाहिराती अनषंगाने शुध्दीपत्रक काढण्यात येत असून, सदर जाहिरातील मुद्दा क्र. ३.१ (साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी किंवा सक्षम प्राधिका-यांने केलेल असावे.) ही अट शिथील करण्यात येत असून, उमेदवाराने स्वतःचा अलीकडच्या काळातील फोटो चिकटवून तो स्वतः साक्षांकित करावा तसेच शैक्षणीक अर्हता व इतर सर्व प्रमाणपत्रे स्वतः साक्षांकित करुन अर्जासोबत सादर करावे.**

जिल्हा प्रशासन अधिकारी,
यवतमाळ